# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

## निदेश क्र. २०/२०१९

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या आस्थापनेवरील पद वर्ग १,२,३ आणि ४ च्या सरळसेवा भरतीसाठी आयोजीत करावयाच्या लेखी चाचणी परीक्षां आणि पद वर्ग ३ साठी संगणकीय चाचणी परीक्षा, त्यांचा अभ्यासक्रम आणि चाचणी परीक्षां योजना निर्धारीत करणारा (सुधारणा) निदेश, २०१९.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ हा दिनांक १ मार्च, २०१७ पासून लागू झालेला आहे. (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६/२०१७) (याला अधिनियम असे संबोधण्यात येईल) ;

आणि

**ज्याअर्थी,** वर नमुद असलेला अधिनियम गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीसाठी लागू करण्यात आला आहे;

आणि

**ज्याअर्थी,** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या आस्थापनेवरील पद वर्ग १,२,३ आणि ४ च्या सरळसेवा भरतीसाठी आयोजीत करावयाच्या लेखी चाचणी परीक्षां आणि पद वर्ग ३ साठी संगणकीय चाचणी परीक्षा, त्यांचा अभ्यासक्रम आणि चाचणी परीक्षां योजना निर्धारीत करणारा निदेश, २०१८ (निदेश क्र. ३७/२०१८) हा दिनांक १० डिसेंबर, २०१८ रोजी मा. कुलगुरूंनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(८) अंतर्गत निर्गमित केला होता आणि तो दिनांक १०/१२/२०१८ पासून लागू करण्यात आला होता ;

आणि

**ज्याअर्थी,** सदर निदेशामध्ये नमुद असलेला विषय परिनियमाद्वारे नियमित होणे आवश्यक होते ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. ३७/२०१८ हा सहा महिन्याच्या कालावधीमध्ये परिनियमात रूपांतरित होवू शकला नव्हता ;

आणि

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(८) च्या परंतुकामध्ये करण्यात आलेल्या तरतुदीनुसार निदेश क्र. ३७/२०१८ ची परिणामकारकता दिनांक ०९/०६/२०१९ रोजी आपोआप व्यपगत झाली होती ;

आणि

**ज्याअर्थी**, निदेश क्र. ३७/२०१८ चे रूपांतरण परिनियमात केले जाण्याची प्रक्रिया वेळ खाऊ स्वरूपाची होती ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. ३७/२०१८ चे नुतनीकरण नवीन निदेशामध्ये केले जाणे आवश्यक झाले होते ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. ३७/२०१८, परिशिष्ट — ठ मधील परिच्छेद १५ अंतर्गत संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ तर्फे सुचित सुधारणेचा समावेश नव्याने प्रसारीत होणाऱ्या गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या आस्थापनेवरील पद वर्ग १,२,३ आणि ४ च्या सरळसेवा भरतीसाठी आयोजीत करावयाच्या लेखी चाचणी परीक्षां आणि पद वर्ग ३ साठी संगणकीय चाचणी परीक्षा, त्यांचा अभ्यासक्रम आणि चाचणी परीक्षां योजना निर्धारीत करणाऱ्या निदेशामध्ये केला जाणे आवश्यक होते;

आणि

**ज्याअर्थी,** व्यवस्थापन परिषदेच्या सभा दिनांक २३ ऑगस्ट, २०१९ च्या सभेतील बाब क्र. ९६ नुसार वर्ग ४ च्या पदभरती संदर्भात झालेल्या ठरावानुसार परिक्षा योजनेमध्ये झालेला बदल निर्धारीत करणाऱ्या निदेशामध्ये केला जाणे आवश्यक होते;

**त्याअर्थी,** मी. डॉ. ना. व्यं. कल्याणकर, कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे, अधिनियम, २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत मला प्राप्त असलेल्या अधिकारा अंतर्गत निदेश क्र. ३७/२०१८ चे नुतनीकरण काही दुरुस्तीसह निर्गमित करीत आहे.

१. या निदेशाला ''**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या आस्थापनेवरील पद वर्ग १,२,३ आणि ४ च्या सरळसेवा भरतीसाठी आयोजीत करावयाच्या लेखी चाचणी परीक्षां आणि पद वर्ग**

**३ साठी संगणकीय चाचणी परीक्षा, त्यांचा अभ्यासक्रम आणि चाचणी परीक्षा योजना निर्धारीत करणारा निदेश, २०१९''** असे संबोधण्यात येईल.

२. हा निदेश ज्या तारखेला निर्गमित करण्यात येईल त्या तारखेपासून लागू असेल.

३. निदेश क्र. १९/२०१९ मधील तरतुदींच्या अधिन राहून पद वर्ग १ च्या सरळसेवा पदभरतीसाठी लेखी चाचणी अभ्यासक्रम, परीक्षा योजना आणि मुलाखत या संबधीचे विवरण नमुद असलेले परिशिष्ट – अ ( पृष्ठ क्र. १ आणि २) जोडण्यात आले आहे.

या परिशिष्ट – अ मध्ये पद वर्ग १, प्रश्नपत्रिका क्रमांक, प्रश्नपत्रिका विभागनिहाय गुण, एकुण गुण, किमान पात्रता गुण, प्रश्नसंख्या, अभ्यासक्रम, प्रश्नाचे स्वरुप, प्रश्नपत्रिकेचे माध्यम आणि लेखी चाचणी परीक्षेचा कालावधी या संबधातील तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच उमेदवाराची मुलाखत आणि मुलाखतीसाठी पदनिहाय उमेदवार संख्या सुत्र या संबधीचा उल्लेख या परिशिष्टामध्ये करण्यात आला आहे.

४. पद वर्ग २ च्या सरळसेवा भरतीसाठी लेखी चाचणी अभ्यासक्रम, परीक्षा योजना आणि मुलाखत या संबधीचे विवरण नमुद असलेले परिशिष्ट – ब ( पृष्ठ क्र. १ आणि २) जोडण्यात आले आहे.

या परिशिष्ट – ब मध्ये पद वर्ग २, प्रश्नपत्रिका क्रमांक, प्रश्नपत्रिका विभागनिहाय गुण, एकुण गुण, किमान पात्रता गुण, प्रश्नसंख्या, अभ्यासक्रम, प्रश्नाचे स्वरुप, प्रश्नपत्रिकेचे माध्यम आणि लेखी चाचणी परीक्षेचा कालावधी या संबधातील तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच उमेदवाराची मुलाखत आणि मुलाखतीसाठी पदनिहाय उमेदवार संख्या सुत्र या संबधीचा उल्लेख या परिशिष्टामध्ये करण्यात आला आहे.

५. पद वर्ग ३ च्या पदभरतीत लेखी आणि संगणकीय चाचणींसाठी अभ्यासक्रम, परीक्षा योजना आणि मुलाखत या संबधीचे विवरण नमुद असलेले परिशिष्ट – क ( पृष्ठ क्र. १,२ आणि ३) जोडण्यात आले आहे.

या परिशिष्ट – क मध्ये पद वर्ग ३, प्रश्नपत्रिका क्रमांक, प्रश्नपत्रिका विभागनिहाय गुण, एकुण गुण, किमान पात्रता गुण, प्रश्नसंख्या, अभ्यासक्रम, प्रश्नाचे स्वरुप, प्रश्नपत्रिकेचे माध्यम आणि लेखी चाचणी व संगणकीय चाचणी परीक्षांचा कालावधी या संबधातील तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच उमेदवाराची मुलाखत आणि मुलाखतीसाठी पदनिहाय उमेदवार संख्या सुत्र या संबधीं या परिशिष्टामध्ये उल्लेख करण्यात आला आहे.

६. पद वर्ग ४ च्या पदभरतीत लेखी चाचणीसाठी अभ्यासक्रम, परीक्षा योजना आणि मुलाखत या संबधीचे विवरण नमुद असलेले परिशिष्ट – ड ( पृष्ठ क्र. १ आणि २) जोडण्यात आले आहे.

या परिशिष्ट – ड मध्ये पद वर्ग ४, प्रश्नपत्रिका क्रमांक, प्रश्नपत्रिका विभागनिहाय गुण, एकुण गुण, किमान पात्रता गुण, प्रश्नसंख्या, अभ्यासक्रम, प्रश्नाचे स्वरुप, प्रश्नपत्रिकेचे माध्यम आणि लेखी चाचणी परीक्षेचा कालावधी या संबधातील तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच उमेदवाराची मुलाखत व्यक्तिमत्व चाचणीद्वारे घेण्यात येईल व त्यास

गुणदान नसतील. सदर व्यक्तिमत्व चाचणी करीता पदनिहाय उमेदवार संख्या सुत्र या संबधी परिशिष्ट — ड मध्ये उल्लेख करण्यात आला आहे.

७. या सोबत जोडून असलेल्या परिशिष्ट — च (पृष्ठ क्र. १,२ आणि ३) मध्ये पद वर्ग १ च्या लेखी चाचणी परीक्षेसाठी नमुना प्रश्नपत्रिका पुरविण्यात आली आहे. या प्रश्नपत्रिकेमध्ये चार विभाग दर्शविण्यात आले असून सर्व विभागातील सर्व प्रश्न अनिवार्य आहेत. विभाग अ, ब आणि क मधील प्रत्येक प्रश्नाला एक गुण असून विभाग ड — (१) आणि ड —(२) मधील प्रत्येक प्रश्नाला अनक्रमे पाच गुण आहेत. या चाचणीमध्ये पात्रता धारण करण्यासाठी ९० पैकी ४५ गुण प्राप्त करणे अनिवार्य मानण्यात आले आहे. या प्रश्नपत्रिकेमधील मराठी उताऱ्यावरील प्रश्न वगळता इतर प्रश्नांचे माध्यम इंग्रजी असेल.

८. या सोबत जोडून असलेल्या परिशिष्ट — छ (पृष्ठ क्र. १,२,३ आणि ४) मध्ये पद वर्ग २ च्या लेखी चाचणी परीक्षेसाठी नमुना प्रश्नपत्रिका पुरविण्यात आली आहे. या प्रश्नपत्रिकेमध्ये चार विभाग दर्शविण्यात आले असून सर्व विभागातील प्रश्न अनिवार्य आहेत. विभाग अ,ब आणि क मधील प्रत्येक प्रश्नाला एक गुण असून विभाग ड — (१) आणि ड —(२) मधील प्रश्नाला अनुक्रमे पाच गुण आहेत. या चाचणीमध्ये पात्रता धारण करण्यासाठी ९० पैकी ४५ गुण प्राप्त करणे अनिवार्य मानण्यात आले आहे. या प्रश्नपत्रिकेमधील मराठी उताऱ्यावरील प्रश्न वगळता इतर प्रश्नांचे माध्यम इंग्रजी असेल.

९. या सोबत जोडून असलेल्या परिशिष्ट — ज (पृष्ठ क्र. १,२, आणि ३) मध्ये पद वर्ग ३ च्या लेखी चाचणी परीक्षेसाठी नमुना प्रश्नपत्रिका पुरविण्यात आली आहे. या प्रश्नपत्रिकेमध्ये दोन विभाग दर्शविण्यात आले असून पहील्या विभागात ५० व दुसऱ्या विभागात २० प्रश्न असतील सर्व प्रश्न अनिवार्य असतील. पहीला विभाग अ आणि दुसरा विभाग ब मधील प्रत्येक प्रश्नाला एक गुण असेल. लेखी चाचणी परीक्षेत पात्र होण्यासाठी ७० पैकी ३५ गुण प्राप्त करणे अनिवार्य असेल. इंग्रजी भाषेशी निगडीत प्रश्न आणि गणिताशी निगडीत प्रश्नातील अंक वगळून प्रश्नपत्रिकेचे माध्यम मराठी असेल.

१०. या सोबत जोडून असलेल्या परिशिष्ट — झ (पृष्ठ क्र. १ आणि २) मध्ये पद वर्ग ३ च्या संगणकीय चाचणी परीक्षेसाठी नमुना प्रश्नपत्रिका पुरविण्यात आली आहे. या प्रश्नपत्रिकेमध्ये दोन विभाग दर्शविण्यात आले असून सर्व विभागातील प्रश्न अनिवार्य आहेत. विभाग अ आणि ब ला अनुक्रमे १० गुण असणार आहेत. या चाचणी परीक्षेमध्ये पात्रता धारण करण्यासाठी प्रत्येक विभागातील १० गुणापैकी ०५ गुण प्राप्त करणे अनिवार्य असेल. या प्रश्नपत्रिकेच्या अ विभागाचे माध्यम इंग्रजी आणि ब विभागाचे माध्यम मराठी असेल.